(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांचे सशक्तीकरण

**संशोधक विद्यार्थी भिसे सौदागर सतीश संशोधक मार्गदर्शक प्रा.डॉ.आर.एफ आंबड** असोसिएट प्रोफेसर, हेड ऑफ कॉमर्स डिपार्टमेंट, संभाजी महाविद्यालय मुरुड ता.जि.लातूर

---


- **सारांश** :

आज एकविसाव्या शतकात स्त्री करिअरच्या बाबतीत फार सजग झाली आहे. तिने जवळपास सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत.प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी आजची स्त्री प्रयत्नशील आहे.पुरुषांची मक्तेदारी मोडीत काढत त्या जवळपास सर्व क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत.त्या हळूहळू सक्षम बनत चालल्या आहेत.महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम बनवणे होय.त्यातील महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी लघुउद्योग हे एक महत्त्वाचे साधन ठरत आहे. लघुउद्योगांमध्ये महिला अ) संचालक ब) व्यवस्थापक क) कर्मचारी अशा तीन वेगवेगळ्या स्वरूपात कार्य करताना दिसतात.त्यातून त्या मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होऊन स्वतःचा व आपल्या कुटुंबाचा आर्थिक विकास घडवून आणत आहेत. सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अहवालानुसार, सध्या देशात 33,17,496 एवढ्या महिला वेगवेगळ्या उद्योगांच्या माध्यमातून काम करत आहेत.त्यामुळे लघुउद्योग हे महिलांच्या सशक्तीकरणासाठी प्रभावी क्षेत्र मानले जात आहे


- **प्रस्तावना**:

भारतामध्ये स्त्रियांची स्थिती आज बऱ्याचशा प्रमाणात विकसित असलेली दिसून येते. आज स्त्रिया शैक्षणिक,आर्थिक, राजकीय व सामाजिक या सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रेसर असलेल्या दिसून येतात.पूर्वीचे 'चूल आणि मूल' हे स्त्रिया विषयी गुंफले गेलेले सूत्र मागे पडून आज स्त्रिया चौकटीच्या बाहेर जाऊन आपले अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत. समाजात 50% प्रमाण असणाऱ्या स्त्रियांना हा समाज दुर्बल घटक म्हणून पाहत होता, परंतु आजच्या परिस्थितीत भारतामध्ये संघराज्यात्मक रचना,निधर्मी लोकशाही, समाजवादी रचना अशी घटनात्मक चौकट तसेच विकसनशील आर्थिक रचना केले आहे.यातून समाजातील कमकुवत घटकांच्या कल्याणासाठी प्रयत्न होताना दिसून येत आहे. सर्व भारतीयांना सामाजिक,आर्थिक आणि राजकीय समानतेसाठी समाज संधी देण्याचे तत्व घटनेने दिले आहे.त्याचा फायदा नक्कीच स्त्रियांचे जीवनमान उंचावण्यास होत आहे.

भारतीय आर्थिक व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करावयाचा झाला,तर स्त्रियांना आज आपले अर्थव्यवस्थेतील स्थान निश्चित करण्यासाठी शासनाने विविध उपक्रमांमधून त्यांना संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.औद्योगिक क्षेत्राचा विचार करावयाचा झाला, तर लघुउद्योग हे महिला सशक्तिकरण चे एक प्रभावी माध्यम आहे.लघु उद्योगांच्या वैशिष्ट्यावरून हे क्षेत्र सर्वसामान्य स्त्रियांना सहज परवडणारे व सोईस्कर असल्याचे दिसून येते.लघु उद्योगांमध्ये जास्त कौशल्याची, उच्च शिक्षणाची गरज भासत नाही.भारतातील बहुसंख्य स्त्रिया या उच्चशिक्षित नाहीत तसेच विविध व्यवसायायुक्त कौशल्याने परिपूर्णही नाहीत. त्यामुळे त्यांचा लघु उद्योगांमध्ये सहभाग वाढवणे महत्त्वाचे आहे.तसेच या क्षेत्रामध्ये भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याने कितीतरी महिलांचा बेरोजगारीचा प्रश्न या लघु उद्योगांच्या माध्यमातून कमी होऊ शकतो.

लघु उद्योगांच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर बनू शकतात आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात.या उद्योगांमुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते आणि आपल्या कुटुंबाला सुद्धा त्या हातभार लावू शकतात.

या संशोधन पेपरमधून, लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांचे सशक्ती करण कसे होते, किती महिला यात सहभागी आहेत,याचा अभ्यास केला जाईल. लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तिकरणात येणाऱ्या समस्या, त्या समस्यावर असणारे उपाय,तसेच केंद्र सरकार मार्फत महिला लघुउद्योजकांना दिल्या जाणाऱ्या योजनांची माहिती घेतली जाईल.थोडक्यात महिला सशक्तिकरणात लघुउद्योगांचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

- **संशोधनाची उद्दिष्टे:**

1. देशातील लघुउद्योगांतील महिलांच्या योगदानाचा अभ्यास करणे
2) महिलांच्या सशक्तीकरणात लघुउद्योगांच्या होणाच्या फायद्याचा अभ्यास करणे.
3) लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
4) लघु उद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणात येणाऱ्या

समस्यांवर उपाय योजना शोधणे.

5 केंद्र सरकारद्वारे महिला लघुख्योजकांना दिल्या जाणाया योजनांची माहिती देणे.

- **संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने द्वितीय सामुग्रीवर आधारित असून यामध्ये विविध प्रकाशित झालेले लेख वेगवेगळे संदर्भ ग्रंथ मारिक सप्ताहिक, नियतकालिके, लघुउद्योगा संबंधित विविध अहवाल, इंटरनेट इत्यादी दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

- **सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांची व्याख्या:**

एमएसएमई ची व्याख्या अभ्यासताना प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा 2006 नुसार,एमएसएमई ने लघुउद्योगांचे दोन गटात वर्गीकरण केले आहे.

1) उत्पादन करणारे उद्योग

2) सेवा देणारे उद्योग त्यानुसार या क्षेत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. 1

सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांची व्याख्या

| प्रकार | उत्पादन<br>उत्पादन यंत्रसामुग्रीमधील गुंतवणुक | सेवा<br>उपकरणांमधील गुंतवणुक |
|---|---|---|
| सुक्ष्म | 25 लाखापर्यंत | 10 लाखापर्यंत |
| लघु | 25 लांखापासून ते 5 कोटीपर्यंत | 10 लाखांपासून ते 20कोटी. पर्यंत |
| मध्यम | 5 कोटीपासून ते 20 कोटीपर्यंत | 2 कोटीपासून ते 5 कोटी-पर्यंत |

वरील प्रमाणे एमएसएमई उद्योगांचे विभाजन दोन भागांत करते,l.त्यांच्या गुंतवणुकीवरूनच क्षेत्राची व्याख्या केली जाते.तसेच ही गुंतवणूक मर्यादा भविष्यात ही सारखीच राहील याची शाश्वती नसते. अर्थव्यवस्थेमध्ये होणाऱ्या बदलामुळे काही वेळा ही मर्यादा वाढवली ही जाते किंवा कमीही केली जाते.

- **लघु उद्योगांची व्याख्या:**

भारतामध्ये लघु उद्योगाच्या व्याख्येमध्ये सुमारे 15 वेळा बदल करण्यात आला आहे त्याचा परामर्श पुढील प्रमाणे:

तक्ता क्र. 2

लघु उद्योगांच्या व्याख्येतील बदलते स्वरूप यंत्र व यंत्रसामग्रीतील गुंतवणूक

| दिनांक | मंत्रालय समिती किंवा<br>सहभागी योजना | गुंतवणूक | रोजगार व्यक्तीची संख्या |
|---|---|---|---|
| 06-04-1948 | औदयोगिक धोरणाविषयक ठराव | | |
| 1950 | फिस्कल समिती | | 10 ते 50 कामगार |
| 1951 | औदयोगिक (विकास आणि नियमन) कायदा | | 50 (जर विजेचा वार करित असतीठ 100 (जर विजेचा व करित नसतील तर) |
| 06-01-1955 | कर्वे समितीच्या शिफारशीनुसार भारत शासन | 5 लाख | 50 (जर विजेचा वापर करित असतील तर 100 (जर विजेचा वापर करित नसतील तर) प्रति शिफ्ट |
| सप्टेंबर 1957 | लघु उद्योग मंडळ | ₹ 5 लाख | प्रति शिफ्ट अनेक शिफ्ट मध्य बदल करण्यात आला |
| 04-01-1960 | व्यापार आणि औदयोगिक मंत्रालय | ₹ 5 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |

| | | | |
|---|---|---|---|
| 08-07-1966 | व्यापार आणि औदयोगिक मंत्रालय, भारत शासन | ₹ 7.50 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| 1977 | औदयोगिक धोरणविषयक ठराव भारत शासन | ₹ 10 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| जुलै 1980 | औदयोगिक धोरण, भारत शासन | ₹ 20 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| मार्च 1985 | औदयोगिक योजनेच्या निवेदनानुसार | ₹ 35 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| 20-08-1991 | औदयोगिक धोरण विषय ठराव, भारत शासन | ₹ 60 लाख | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| फेब्रुवारी 1997 | आबिद हुसेन समितीच्या शिफारशीनुसार, भारत शासन | ₹ 3 करोड | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| 1999 | भारत शासन | ₹ 1 करोड | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| 2001 | 'एसआयडीबीआय' ने वित्त व्यवस्थेला केलेल्या. प्रस्तावनानुसार, भारत शासन | ₹ 1 करोड | रोजगार व्यक्तींची संख्या लक्षात न घेता |
| 2006 | सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास (एमएसएमई) कायदा, 2006 | 1] उत्पादन- ₹25 लाखापेक्षा जास्त परंतू ₹ 5 करोड पेक्षा कमी<br>2] सेवा- ₹10 लाखपेक्षा जास्त परंतू ₹2 करोडपेक्षा कमी | |

वरील व्याख्येवरून समजते की, लघुउद्योगाची व्याख्या ही निश्चित अशी एकच नाही, तर ती वारंवार बदलण्यात आली आहे. या व्याख्या उत्पादन संस्थांचा आकार,गुंतविलेले भांडवल व उत्पादन संस्थात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या यांच्या आधारावर केलेल्या आहेत.सध्या एमएसएमई कायदा 2006 नुसार लघुउद्योगांची व्याख्या प्रमाणित धरली जाते.

- **लघुउद्योगांचे प्रकार:**

सर्वसामान्यपणे लघुउद्योगांचे पारंपारिक लघुउद्योग व आधुनिक लघुउद्योग असे दोन प्रकार पडतात.

1) पारंपारिक लघुउद्योग: यामध्ये खादी उद्योग,ग्रामीण उद्योग,हातमाग उद्योग, काथ्या उद्योग,रेशीम उद्योग,कुटीर उद्योग इत्यादींचा समावेश होतो.

2) आधुनिक लघुउद्योग: यामध्ये निर्माण करणारे उद्योग सहाय्यभूत उद्योग, सेवा उद्योग, छोटे लघुउद्योग इत्यादींचा समावेश होतो.

जरी काही लघुउद्योग हे पारंपारिक पद्धतीवर अवलंबून असले,तरी संस्कृती, परंपरा टिकविण्यात त्यांचा मोलाचा वाटा दिसून येतो.आधुनिक उद्योगांप्रमाणेच पारंपारिक उद्योग ही भारतीय अर्थव्यवस्थेत तग धरून असलेले पहावयास मिळतात.सर्व प्रकारच्या उद्योगांमधून पुरुषाबरोबर महिलांना सुद्धा रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊन महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत झाली आहे.

- **केंद्र व राज्य सरकारद्वारे महिला उद्योजकांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना:**

उद्योजक म्हणून महिलांच्या वाढत्या उपस्थितीमुळे देशात महत्त्वपूर्ण व्यवसायात वाढ होऊन आर्थिक विकास साधला जात आहे. देशात रोजगाराच्या संधी निर्माण करून, जनसांख्यिकीय बदल आणि महिला संस्थापकांच्या पुढील पिढीला प्रेरणा देऊन,महिलांच्या मालकीचे उद्योग समाजात प्रमुख भूमिका बजावत आहेत.

देशातील संतुलित वाढीसाठी महिला उद्योजकांच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनासह भारत व राज्य सरकार महिला उद्योजकता मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहेत.त्यामुळे ते महिला उद्योजकांना खालील योजना प्रदान करतात.

1) कौशल्य अप ग्रेडेशन आणि महिला कॉयर योजना

2) महिला समृद्धी योजना 3) महिला उद्योजकता व्यासपीठ (डब्ल्यूईपी) 4) व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास (टीआरईएडी)

5) महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमांना सहाय्य

6) महिला/महिला उद्योमी योजनेसाठी मुद्रा योजना 7) स्टॅन्ड-अप इंडिया 8) नई रोशनी - अल्पसंख्यांक महिलांच्या नेतृत्व विकासासाठी योजना

9) महिला शक्ती केंद्र 10) नारी शक्ती पुरस्कार

11) महिला वैज्ञानिक योजना 12) राष्ट्रीय स्टार्ट - अप पुरस्कार

13) बीआयआरएसी - टीआयई विजेता पुरस्कार
14) सूक्ष्म व लघुउद्योगांसाठी पत हमी योजना
15) महिला - समृद्धी - योजना

वरील योजनांमधून महिलांना उद्योजकतेकडे आकर्षित करून सक्षम बनवण्यासाठीचे केंद्र व राज्य सरकारचे प्रयत्न आहेत. भविष्यकाळात अनेक महिला उद्योजक आपणास पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंवा त्यांच्यापेक्षा सरस काम करताना आढळून येतील.

**लघुउद्योगांतील महिलांचा सहभाग/योगदान** :

लघुउद्योगातील महिलांचे योगदान हे तीन भागात विभागले जाते.

1) उद्योजिकाच्या स्वरूपात 2) व्यवस्थापकाच्या स्वरूपात
3) कर्मचाऱ्याच्या स्वरूपात

आपण तिन्ही स्वरूपातील महिलांचे योगदान अभ्यासल्यास त्यातून महिलांना किती रोजगार मिळाला आणि त्यांना किती आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होऊन त्यांचे सशक्तिकरण झाले याची माहिती आपण घेणार आहोत.

1) लघुउद्योजकाच्या स्वरूपातील महिलांचे योगदान

भारतातील लघुउद्योगांत उद्योजक म्हणून महिलांचा सहभाग अभ्यासण्यासाठी देशातील विविध राज्यातील अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा उद्योजक म्हणून सहभाग अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

तक्ता क्र. 3


राज्यनिहाय महिला उद्योजक असलेल्या लघुउद्योगांची आकडेवारी

| अ. क्र. | राज्य | महिला उद्योजक असलेल्या लघू उद्योगांची संख्या | एकूण उद्योजक महिलांच्या संदर्भात टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | जम्मू आणि काश्मिर | 5742 | 0.53 |
| 2 | हिमाचल प्रदेश | 3722 | 0.03 |
| 3 | पंजाब | 29068 | 2.80 |
| 4 | चंदगड | 2243 | 0.21 |
| 5 | उत्तराखंड | 8804 | 0.82 |
| 6 | हरियाणा | 9620 | 1.02 |
| 7 | दिल्ली | 14383 | 1.35 |
| 8 | राजस्थान | 36371 | 3.41 |
| 9 | उत्तर प्रदेश | 72667 | 6.83 |
| 10 | बिहार | 49443 | 4.64 |
| 11 | सिक्कीम | 98 | 0.009 |
| 12 | अरुणाचल प्रदेश | 150 | 0.014 |
| 13 | नागालँड | 179 | 0.016 |
| 14 | मणिपूर | 10745 | 0.01 |
| 15 | मिझोरम | 3700 | 0.34 |
| 16 | त्रिपुरा | 863 | 0.08 |
| 17 | मेघालय | 3580 | 0.33 |
| 18 | आसाम | 11757 | 1.10 |
| 19 | पश्चिम बंगाल | 69625 | 6.54 |
| 20 | झारखंड | 7865 | 0.73 |
| 21 | ओडिसा | 38233 | 3.59 |
| 22 | छत्तीसगड | 10034 | 0.94 |
| 23 | मध्यप्रदेश | 68823 | 6.47 |
| 24 | गुजरात | 53703 | 5.04 |
| 25 | दमन आणि दिव | 213 | 0.02 |
| 26 | दादर आणि नगर हवेली | | |
| 27 | महाराष्ट्र | 100670 | 9.46 |
| 28 | आंध्रप्रदेश | 77116 | 7.25 |
| 29 | कर्नाटक | 103169 | 9.69 |

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | गोवा | 810 | 0.07 |
| 31 | लक्षद्विप | 67 | 0.006 |
| 32 | केरळ | 139225 | 13.08 |
| 33 | तमिळनाडू | 129808 | 12.20 |
| 34 | पाँडेचेरी | 1065 | 0.10 |
| 35 | अंदमान आणि निकोबार | 110 | 0.01 |
| 36 | संपूर्ण भारत | 1063721 | 100 |

आलेख क्र. 1

राज्यनिहाय महिला उद्योजक असलेल्या लघुउद्योगांची टक्केवारी




वरील आलेख व तक्त्यावरून असे लक्ष्यात येते कि, महिला उद्योजक असलेल्या लघुउद्योगांची संख्या 10,63,721 एवढी आहे.त्यात केरळ (13.08%), तामिळनाडू (12.20%), कर्नाटक (9.69%), महाराष्ट्र (9.46%), आंध्रप्रदेश (7.25%) पश्चिम बंगाल (6.54%) या सहा राज्यांतील टक्केवारी ही जास्त आहे. इतर सर्व राज्यांची मिळून (41.57%) टक्केवारी आहे तर लक्षद्वीपची (0.006%) सर्वात कमी आहे.

2) व्यवस्थापक म्हणून महिलांचे योगदान:

भारतातील लघुउद्योगांतील व्यवस्थापक म्हणून महिलांचा सहभाग अभ्यासण्यासाठी देशातील विविध राज्यातील अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा व्यवस्थापक म्हणून सहभाग अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

तक्ता क्र. 4


राज्यनिहाय महिला व्यवस्थापक असलेल्या लघुउद्योगांची आकडेवारी

| अ. क्र. | राज्य | महिला व्यवस्थापक असलेल्या लघू उद्योगांची संख्या | एकूण व्यवस्थापक महिलांच्या संदर्भात टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | जम्मू आणि काश्मिर | 5640 | 0.56 |
| 2 | हिमाचल प्रदेश | 3515 | 0.35 |
| 3 | पंजाब | 30190 | 3.03 |
| 4 | चंदगड | 2059 | 0.20 |
| 5 | उत्तराखंड | 8706 | 0.87 |
| 6 | हरियाणा | 10087 | 1.01 |
| 7 | दिल्ली | 13368 | 1.34 |
| 8 | राजस्थान | 29785 | 2.99 |
| 9 | उत्तर प्रदेश | 54491 | 5.47 |
| 10 | बिहार | 38170 | 3.83 |
| 11 | सिक्कीम | 30 | 0.003 |
| 12 | अरुणाचल प्रदेश | 131 | 0.013 |
| 13 | नागालँड | 207 | 0.02 |
| 14 | मणिपूर | 9168 | 0.92 |
| 15 | मिझोरम | 3076 | 0.30 |
| 16 | त्रिपुरा | 631 | 0.06 |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | मेघालय | 3658 | 0.36 |
| 18 | आसाम | 11189 | 1.12 |
| 19 | पश्चिम बंगाल | 71847 | 7.21 |
| 20 | झारखंड | 7271 | 0.73 |
| 21 | ओडिसा | 33274 | 3.34 |
| 22 | छत्तीसगड | 11766 | 1.18 |
| 23 | मध्यप्रदेश | 62351 | 6.26 |
| 24 | गुजरात | 55361 | 5.56 |
| 25 | दमन आणि दिव | 167 | 0.016 |
| 26 | दादर आणि नगर हवेली | | |
| 27 | महाराष्ट्र | 80662 | 8.10 |
| 28 | आंध्रप्रदेश | 77347 | 7.77 |
| 29 | कर्नाटक | 101264 | 10.17 |
| 30 | गोवा | 677 | 0.06 |
| 31 | लक्षद्विप | 61 | 0.006 |
| 32 | केरळ | 137561 | 13.82 |
| 33 | तमिळनाडू | 130289 | 13.09 |
| 34 | पाँडेचेरी | 1089 | 0.10 |
| 35 | अंदमान आणि निकोबार | 53 | 0.005 |
| 36 | संपूर्ण भारत | 995141 | 100 |

आलेख क्र. 2

राज्यनिहाय महिला व्यवस्थापक असलेल्या लघुउद्योगांची टक्केवारी




वरील आलेख व तक्त्यावरून असे लक्ष्यात येते कि, महिला व्यवस्थापक असलेल्या लघुउद्योगांची संख्या 9,95,141 एवढी आहे. त्यात केरळ (13.82%), तामिळनाडू (13.09%), कर्नाटक (10.17%), महाराष्ट्र (8.10%), आंध्रप्रदेश(7.77%) पश्चिम बंगाल (7.21%) या सहा राज्यांतील टक्केवारी ही जास्त आहे. इतर सर्व राज्यांची मिळून (39.74%) टक्केवारी आहे तर सिक्कीमची (0.003%) सर्वात कमी आहे.

3) कर्मचारी म्हणून महिलांचे योगदान:

भारतातील लघु उद्योगात कामगार महिलांचा सहभाग अभ्यासण्यासाठी देशातील विविध राज्यातील अर्थव्यवस्थेमध्ये कामगार महिलांचा सहभाग अभ्यासणे महत्त्वाचे आहे. लघु उद्योगातील कामगार महिलांचा सहभाग पुढीलप्रमाणे आहे :

तक्ता क्र. 5


राज्यनिहाय महिला कर्मचारी असलेल्या लघुउद्योगांची आकडेवारी

| अ. क्र. | राज्य | कामगार महिलांची संख्या (लाखात) | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | नोंदणीकृत लघु उद्योग | अनोंदणीकृत लघु उद्योग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | जम्मू आणि काश्मिर | 3313 | 8153 | 11466 |
| 2 | हिमाचल प्रदेश | 4096 | 4134 | 8150 |
| 3 | पंजाब | 11757 | 36013 | 47770 |
| 4 | चंदगड | 659 | 1975 | 2634 |
| 5 | उत्तराखंड | 2940 | 13240 | 16180 |
| 6 | हरियाणा | 15651 | 14889 | 30540 |
| 7 | दिल्ली | 6306 | 35798 | 42104 |
| 8 | राजस्थान | 15003 | 46065 | 61068 |
| 9 | उत्तर प्रदेश | 23506 | 180918 | 204424 |
| 10 | बिहार | 8353 | 68908 | 77261 |
| 11 | सिक्कीम | 212 | 09 | 221 |
| 12 | अरुणाचल प्रदेश | 342 | 104 | 446 |
| 13 | नागालँड | 636 | 2574 | 3211 |
| 14 | मणिपूर | 3853 | 19485 | 23338 |
| 15 | मिझोरम | 2188 | 2636 | 6824 |
| 16 | त्रिपुरा | 4294 | 3325 | 7619 |
| 17 | मेघालय | 3139 | 5664 | 8803 |
| 18 | आसाम | 9077 | 16988 | 26065 |
| 19 | पश्चिम बंगाल | 265479 | 304969 | 331518 |
| 20 | झारखंड | 5105 | 8907 | 14012 |
| 21 | ओडिसा | 71723 | 213123 | 224846 |
| 22 | छत्तीसगड | 1077 | 52476 | 62653 |
| 23 | मध्यप्रदेश | 29612 | 111703 | 141315 |
| 24 | गुजरात | 41189 | 79990 | 121179 |
| 25 | दमन आणि दिव | 6106 | 126 | 6232 |
| 26 | दादर आणि नगर हवेली | | | |
| 27 | महाराष्ट्र | 778731 | 162700 | 241431 |
| 28 | आंध्रप्रदेश | 60693 | 270026 | 330719 |
| 29 | कर्नाटक | 117934 | 223142 | 341076 |
| 30 | गोवा | 5309 | 1833 | 7142 |
| 31 | लक्षद्विप | 29 | 405 | 431 |
| 32 | केरळ | 189640 | 224491 | 414131 |
| 33 | तमिळनाडू | 270936 | 223050 | 493986 |
| 34 | पाँडेचेरी | 5613 | 2670 | 8283 |
| 35 | अंदमान आणि निकोबार | 124 | 294 | 498 |
| 36 | संपूर्ण भारत | 974713 | 2342783 | 3317496 |

आलेख क्र. 3

राज्यनिहाय महिला कर्मचारी असलेल्या लघुउद्योगांची टक्केवारी



वरील आलेख व तक्त्यावरून असे दिसून येते कि, नोंदणीकृत लघुउद्योगांतील एकूण कामगार महिलांची संख्या 9,74,713 एवढी असून अनोंदणीकृत लघुउद्योगांतील एकूण कामगार महिलांची संख्या 23,42,783 एवढी आहे.तर दोन्ही वर्गातील मिळून ही संख्या 33,17,496 एवढी आहे. नोंदणीकृत लघुउद्योगांतील कामगारांची टक्केवारी (29.39%) एवढी आहे. अनोंदणीकृत लघुउद्योगांतील कामगारांची टक्केवारी (70.61%) एवढी आहे. याचा अर्थ असा होतो की, अनोंदणीकृत लघुउद्योगांतील कामगारांची संख्या हि नोंदणीकृत कामगारांच्या संखेपेक्षा जास्त आहे. संपूर्ण भारतातील लघुउद्योगांतील असणाऱ्या महिला कामगारांची संख्या वाढत आहे. तुलनेने पुरुषापेक्षा कमी असली तरी, त्यांचा सहभाग नाकारता येत नाही. भविष्यात शासनाच्या योजनांमुळे अजून त्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

भारत हा देश सर्वांना समान संधी देणारा तसेच भेदभाव न बाळगणारा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे स्त्री आणि पुरुष यांची संख्या,लिंग प्रमाण,साक्षरता दर, शैक्षणिक पातळी,कामगारांचे प्रमाण या बाबतीत महिलांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. त्यातल्या त्यात लघुउद्योगांमधून महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत आहे.त्यामधून महिला आर्थिक, सामाजिकदृष्ट्या सक्षम बनताना दिसत आहेत. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र यासारख्या राज्यात महिलांचा लघुउद्योगांतील सहभाग जास्त आढळून आला आहे.तर इतरही राज्यात महिला कर्मचारी लघु उद्योगांत सक्रिय असलेल्या पाहण्यास मिळत आहेत. येणाऱ्या काळात त्यांचे प्रमाण आणखीन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी सर्वांनी भरपूर प्रयत्न करणं गरजेचे आहे,

- लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणात येणाऱ्या समस्या:

लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांचे सशक्तिकरण मोठ्या प्रमाणात होत आहे.महिलांचा लघुउद्योगांतील वाढता सहभाग प्रशासनीय आहे.परंतु त्यांना अनेक समस्यांना सुद्धा सामोरे जावे लागत आहे.अतिशय जटिल समस्या भेडसावत असल्यामुळे त्यांच्या सशक्तिकरण्यात अडथळा निर्माण होत आहे.त्या समस्या खालील प्रमाणे आहेत:

1) केंद्र व राज्य शासनामार्फत महिलांना लघुउद्योग करण्यासाठी कर्ज दिले जाते परंतु त्याचा उपयोग घरातील पुरुष आपल्या स्वतःच्या उद्योगात करतात.त्यामुळे महिलांपेक्षा पुरुष उद्योजकांची संख्या जास्त दिसते.

2) घरातील अनेक जबाबदाऱ्यांमुळे महिला लघुउद्योगांसाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत.

3) पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांना लघुउद्योगात सहभागी होण्यासाठी कुटुंबाचा आवश्यक तेवढा पाठिंबा मिळत नाही.

4) अनेक महिला कमी शिकलेल्या असल्यामुळे त्यांच्याकडे नवीन तंत्रज्ञानाच्या ज्ञानाचा अभाव, त्यासाठीच्या प्रशिक्षणाची कमतरता तसेच उत्पादनाची विक्री व विपणनाच्या समस्या येतात.

5) महिलांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या मार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांबद्दल योग्य माहितीचा अभाव दिसतो.

वरीलप्रमाणे लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तिकरणात येणाऱ्या समस्या आहेत.काही महिला या सर्व समस्यांवर मात करून लघुउद्योगांत आपले योगदान देताना दिसून येतात.

- लघुउद्योगांच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणात येणाऱ्या समस्यांवर उपाय योजना:

आधुनिक विकासात्मक भारत घडवायचा असेल,तर यासाठी पुरुषांच्या बरोबरच महिलांचे लघु उद्योगातील योगदान वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी महिलांना लघुउद्योगात सहभाग नोंदवताना येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करणे महत्त्वाचे ठरते.त्यातील काही उपाययोजना खालील प्रमाणे आहेत.

1) महिला लघुउद्योजकांच्या नावावर मंजूर झालेल्या कर्जाची रक्कम योग्य दिशेने वापरली जात आहे की नाही, याची तपासणी केल्यानंतर त्रुटी आढळल्यास दंडाची तरतूद करण्यात यावी.

2) महिलांनी लघुउद्योगांत सहभागी होण्यासाठी त्यांच्या कुटुंबाकडून त्यांना प्रेरणा आणि पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न करणे.

3) ग्रामीण आणि निमशहरी भागातील महिला उद्योजकता विकासासाठी महिलांचे स्वयं - सहायता गट तयार करणे आणि त्यांना बळकटी प्राप्त करून देणे.

4) ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना तसेच कामगारांना तांत्रिक ज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी विविध शिबिरांचे आयोजन करणे.

5) महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी भांडवलाची उभारणी करताना विविध प्रकारे कर्ज देणाऱ्या सरकारी योजना बद्दल माहिती देणे.

वरील उपाययोजना अवलंबल्यास महिलांचे लघुउद्योगातील योगदान नक्कीच वाढेल.आणखीन जास्त प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनतील.

- **निष्कर्ष**:

तक्ता क्रमांक तीन, चार व पाच मधील आकडेवारीचा परामर्श घेता, खालील निष्कर्ष निघताना दिसून येत आहेत.

1. लघुउद्योगांच्या माध्यमातून ते 33,17,496 महिलांना रोजगार प्राप्त
2. झाल्यामुळे त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारलेली दिसून येत आहे.
3. लघुउद्योगांतील महिलांच्या योगदानामध्ये भारतात केरळ राज्य
4. अग्रेसर आहे.त्या पाठोपाठ तामिळनाडू,कर्नाटक,महाराष्ट्र,आंध्रप्रदेश व पश्चिम बंगालमधील महिलांचे योगदान जास्त आहे.
5. नोंदणीकृत लघुउद्योगांपेक्षा अनोंदणीकृत लघुउद्योगांमध्ये महिला
6. कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे.
7. लघुउद्योगातील महिलांच्या सहभागामुळे स्त्री-पुरुष असा भेदभाव कमी होत चाललेला असून महिलांना समाजात मान सन्मान दिला जात आहे.तसेच घरातील आर्थिक निर्णयात महिलांच्या मताचा विचार केला जात आहे.
8. लघुउद्योगांमुळे ग्रामीण भागातील महिलांना शहरी भागात रोजगारासाठी स्थलांतर करण्याची गरज पडत नाही. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळताना दिसून येत आहे.
9. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांमुळे महिला उद्योजकांच्या
10. संख्येत वाढ होताना दिसून येत आहे.
11. लघुउद्योगांत महिला या उद्योजक,व्यवस्थापक व कर्मचारी या
12. तिन्ही स्वरूपात मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्यामुळे लघुउद्योग हे महिलांच्या सशक्तीकरणात प्रभावी साधन ठरत आहे.

- **शिफारशी**:

1. लघुउद्योगांमध्ये काम करणाऱ्या महिलांना अधिकाधिक शाश्वत
2. रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, तसेच प्रत्येक वर्षी त्यांच्या बदलत्या संख्येचा आढावा घ्यावा.
3. केंद्र व राज्य सरकारद्वारे राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती
4. तळागाळातील महिलापर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत.
5. महिला उद्योजकांना भांडवल निर्मितीसाठी शासनाने अर्थसाहाय्य
6. करताना सुलभ कर्ज योजना राबवावी तसेच प्रखरतेने त्याची अंमलबजावणी करावी.
7. महिला लघुउद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनासाठी योग्य
8. बाजारपेठ मिळवून द्यावी, तसेच त्यांना ऑनलाईन विपणनाचे प्रशिक्षण सुद्धा द्यावे.
9. लघुउद्योगांतील महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षतते बरोबरच कामाच्या
10. ठिकाणी भौतिक व आरोग्याच्या सोयी सुविधा प्रदान करण्यात याव्यात.
11. महिलांना समान काम व समान वेतन योजना,नोकरीची हमी
12. यासारख्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी शासनाने करावी.यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.
13. लघुउद्योगांतील महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष पारितोषिक योजना,
14. मार्गदर्शनपर व्याख्याने, परिसंवाद,गटचर्चा यासारख्या प्रोत्साहनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.
15. वरील शिफारशींचा शासनाने विचार केल्यास महिलांचा
16. लघुउद्योगांतील सहभाग आणखीन वाढून त्यांचे सशक्तिकरण होण्यास नक्कीच मदत होईल.

- **समारोप**:

कोणत्याही राष्ट्राची विकास नावाची गोष्ट तिथल्या समाजाच्या सर्व सामान्य व्यक्तींच्या खांद्यावर पेलावी लागते.त्या पेलणाऱ्या महिलाच सक्षम नसतील,तर तो विकास जास्त काळ टिकणार नाही. यासाठी क्षेत्र कोणतेही असो, यामध्ये महिलांना अधिक प्रमाणात घेऊन विकास साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विविध कायदे व योजना राबवल्यास महिलांचा लघु उद्योगातील सहभाग तर वाढेलच,शिवाय त्यांची भौतिक आणि सामाजिक स्थिती सुधारेल.महिलांचे सशक्तिकरण करण्यासाठी कमी शिक्षण असूनही कौशल्याच्या आधारावर विकासाची चौकट ओलांडण्यासाठी लघु उद्योगांचे योगदान

सततच स्वागतास पात्र आहे.लघु उद्योगांचा फायदा सर्व सामान्य शिक्षित तसेच अशिक्षित महिलांच्या सशक्तीकरण्यासाठी व्हावा, यासाठी आपण सर्वजण मिळून आणखीन प्रयत्न करूयात.

- **संदर्भसूची**:

1) Ministry of Micro,Small & Medium Enterprises (MSME)

2) www.msme.gov.in 2006-07

3) http://dcmsme.gov.in

4) https://www.startupindia.gov.in

5) आत्तार ए.ए (2021): "कोल्हापूर जिल्ह्यातील लघुउद्योगातील काम करणाऱ्या महिलांचा अभ्यास".